## शुद्धीपत्रक

शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने विविध विषयातील अधिव्याख्याता, शासकीय कला संस्था, महाराष्ट्र कला शिक्षण सेवा गट-अ या पदासाठी मागणीपत्र आयोगास पाठविले होते. त्याअनुषंगाने आयोगाकडुन संबंधित विषयाकरिता जाहिरात क्र. १७ ते २४/२०१६ दि. १३/४/२०१६ व २८/२०१६, दि. ११/५/२०१६ रोजी प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने उमेदवारांकडून online अर्ज आयोगास प्राप्त झाले आहेत. शासनाने W.P. No. ६३५८/२०१६ या प्रकरणी मा. उच्च न्यायालय यांनी दिलेल्या **अंतरिम** आदेशाच्या अनुषंगाने सदर विषयांच्या मागणीपत्रातील पदसंख्येत बदल करुन सुधारित पदसंख्या आयोगाला कळविली आहे. त्यानुसार आयोगाने दि. १३/४/२०१७ रोजी शुद्धीपत्रकदेखील प्रसिद्ध केले आहे. सदर शुद्धीपत्रकात नमुद केल्याप्रमाणे खालील ३ विषयांकरिता सुधारित पदसंख्येबाबत शासनाचे अभिप्राय उपलब्ध झाले असून त्यानुसार सुधारित पदसंख्या खालीलप्रमाणे आहे.

| जा.क्र. | विषय | एकूण पदे | खुला | अ.जा | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७/२०१६ | रेखा व रंगकला | २*+३■ | -- | -- | १*+१■ | १■ | -- | -- | -- | -- | १*+१■ |
| | | | | | अपंग-निरंक | | | | | | |
| १९/२०१६ | शिल्पकला व प्रतिमानबंध | १ | -- | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | |
| २८/२०१६ | कलेचा इतिहास | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |

( * उपलब्ध असल्यास महिलांकरीता आरक्षित, ■ अनुशेषाची पदे )

शासनाने वरीलप्रमाणे कळविल्यानुसार संबंधित विषयाच्या सुधारित पदसंख्येचे आरक्षण विचारात घेऊन सदर पदाच्या निवडप्रक्रियेची कार्यवाही आयोगाकडून करण्यात येईल, याची संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी.

स.पां.देशमुख
अवर सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

दिनांक : १७ मे, २०१७